# *  खेळाडू उमेदवारांसाठी सूचना  *

पोलीस भरती -२०१८ चे जाहिरातीमध्ये मुद्दा क्र.१९ सामाजिक व समांतर आरक्षण बाबतच्या सुचनांमध्ये “V’ कडे खेळाडु आरक्षणबाबत सुचना नमुद करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये खेळाडू आरक्षणाचा लाभ घेवु इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रिधो-२००२/प्रक्र ६८/क्रियुसे-२ दिनांक ०१/०७/२०१६ आणि तद्नंतर या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक-०२ नुसार गट “क’ कर्मचारी निवडीसाठी क्रिडाविषयक आर्हता नमुद केलेली आहे. खेळाडू समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराने क्रिडाविषयक आर्हता प्रमाणपत्र आवेदन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीचे असणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणेची दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

खेळाडू उमेदवाराने अर्ज करण्यापुर्वी उपरोक्त नमूद शासन निर्णय दि.०१/०७/२०१६ मधील परिच्छेद ४ (पाच) व ६(आठ) मधील तरतुदींनुसार खेळाडू उमेदवाराने पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज करण्यापुर्वी संबंधीत विभागीय उपसंचालक यांचेकडुन खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी केलेली असणे आवश्यक आहे. तसे न केल्यास सदरहु शासन निर्णयातील परिच्छेद ६ (नऊ) मधील तरतूदीनुसार उमेदवाराचा खेळाडु संवर्गातुन विचार करता येणार नाही. त्यामुळे संबंधीत विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असलेबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दि.०३/०३/२०१८ अखेर प्राप्त करणे आवश्यक असुन कागदपत्र पडताळणीचे दिवशी सादर करणे अनिवार्य राहील. सदर उपसंचालक क्रिडा व युवक संचलनालय यांचेकडील खेळविषयक पात्रता प्रमाणपत्र कागदपत्राच्या पडताळणीचे दिवशी सादर न केल्यास संबंधीत उमेदवारास कागदपत्र पडताळणीचे टप्प्यावर अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.